निवृत्तिवेतनधारकांकडून शासनाला येणे असलेल्या रकमांची वसुली तसेच निवृत्तिवेतनधारकांना चुकीने / जादा निवृत्तिवेतनाची रक्कम प्रदान करण्यात आलेली रक्कम वसूल करण्याबाबत --

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०८९/प्र.क्र. २६२/कोष-५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ फेब्रुवारी १९९०.

निर्णय

निवृत्तिवेतनधारकांकडून येणे असलेल्या शासकीय रकमांची वसुली तसेच निवृत्तिवेतनधारकांना निवृत्तिवेतनाच्या चुकीने जादा प्रदान करण्यात आलेल्या रकमांची वसुली कशी करावी याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत केंद्र शासनाशी सल्लामसलत केल्यावर शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे:-

निवृत्तिवेतनधारकांकडून येणे असलेल्या शासकीय रकमांची वसुली, निवृत्तिवेतनधारकांच्या संमतीशिवाय, निवृत्तिवेतनधारकास वेळोवेळी निवृत्तिवेतनावर मिळणा-या महागाई वाढीच्या रकमांमधून करण्यात यावी.

निवृत्तिवेतनधारकाला अतिप्रदान झालेल्या निवृत्तिवेतनाच्या रकमेची वसुली करण्यापूर्वी संबंधित निवृत्तिवेतनधारकास अशा वसुलीबाबतची वस्तुस्थिती योग्य रीतीने समजावून देण्यात यावी आणि त्यावर त्या निवृत्तिवेतनधारकाला प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी पुरेसा अवधी देण्यात यावा. त्यानंतरच संबंधित निवृत्तिवेतनधारकांच्या मूळ निवृत्तिवेतनातून अतिप्रदानाची रक्कम सोईस्कर हप्त्यात वसूल करण्यात यावी. मात्र, वसूल करण्यात येणा-या हप्त्यांची रक्कम निवृत्तिवेतनधारकाला मिळणा-या मूळ निवृत्तिवेतनाच्या १/३ पेक्षा जास्त नसावी.

महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८, खंड-एक मध्ये आवश्यक ती सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व. ना. सावंत,
शासनाचे उप सचिव, वित्त विभाग.

जिल्हाधिकारी कार्यालय,